लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे : एक ऐतिहासिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवी करीता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

कदम व्यंकट काशिनाथराव

वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरूर (ता.)

ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दामाजीवाले माधव दिगंबर

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर (ता.)

ता.अहमदपूर जि.लातूर

मार्च २०२२

लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे : एक ऐतिहासिक अभ्यास

१.१ प्रास्ताविक :-

महाराष्ट्र राज्याच्या कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व खानदेश या पाच विभागातील मराठवाडा एक विभाग आठ जिल्ह्यांचा मिळुन बनलेला विभाग आहे. १८६० पर्यंत मराठवाडी तर नंतर मराठवाडा या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रामध्ये राज्य करणारे सातवाहन हे पहिले घराणे त्या राजकुलाची राजधानी प्रतिष्ठान आज पैठण होय. सातवाहनांना महाराष्ट्रात साम्राज्य स्थापन करण्याचा मान मिळाला. वाकाटक घराण्याची राजधानी विदर्भात प्रवरपूर (पवनार) वाशिम येथे होती. तर राष्ट्रकूट हे घराणे मराठवाड्याच्या इतिहासाशी जवळचे मानले जाते. इतिहासकार अ.स. आतळेकर यांच्या मतानुसार राष्ट्रकूट यांची राजधानी वेरुळ जवळ मानली जाते.

राष्ट्रकुट काळात राजधानीजवळ मंदिर उभारण्याची प्रथा होती. चालुक्यानी मट्टदकल, बदामी तर पहलवांनी कांचीपूरम आणि चोलांनी तंजावर येथे मंदिरे उभारलेली आहेत. शिलहार, यादव ही घराणी मराठवाड्यातीलच कारण ते स्वतःला नगरपुरवराधीश्वर म्हणून घेत तर राष्ट्रकुट लत्तलूर (लातूर) म्हणवून घेत असत.

महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील लातूर जिल्हा हा एक विकसनशील जिल्हा आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि शिक्षण क्षेत्रातली पंढरी म्हणून ओळखला जातो.मुख्य शहरामधील गोलाकार गंजगोलाईची बाजारपेठ मुख्य आकर्षण आहे. याच शहरात हेमाडपंती सिद्धेश्वर व रत्नेश्वर ही मंदिरे आहेत. लातूर जिल्ह्याची राजकीय, नाट्य, संगित नृत्य, चित्र साहित्य कापड उद्योग, व्यवसाय, शेती व कारखानदारी अशा सर्वच क्षेत्रात दमदार वाटचाल राहिलेली आहे.

महाराष्ट्रात लातूर हे ग्रामनाम एकमेव आहे. ग्रामनाम इ.सनाच्या ६ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत शिलालेख, ताम्रपट आणि कांही ग्रंथात उल्लेखित आहे. ग्रामनामाचा संबंध हा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टीने एका राजवटीच्या राजधानीशी दिसतो. राष्ट्रकूटांची लातूर ही नगरी राजधानी होती. लातूर हा शब्द लत्तलूर, लत्तलौर, लत्तनूर व लातनूर असा बनलेला आहे. लातूरच्या रत्नापूर महात्म्यात रत्नापूर व लातूर असा नामोल्लेख आढळतो. पुढे हा संदर्भ मराठी शिलालेखात एक वेळा, संस्कृत भाषेत तीन वेळा, व कन्नड भाषेत सहावेळा आलेला आहे. लातूर शिलालेखातील ग्रामनाम उल्लेखित ओळी पुढीलप्रमाणे आहेत.

अस्ति दिव्यं पुरस्त्रेष्ठं लत्तलौराभिधानकं।

महाजनैः पंचशतैन्वेदविभ्दिर्न्निषे वितं।।

लातूर येथील भूतनाथ (पापविनाश) मंदिर भाषा संस्कृत इ.स. ११ व्या शतकातील नागरी लिपी मध्ये उपलब्ध आहे. या शिलालेखात भूलो कमल्त सोमेश्वर यांची वंशावळ दिल्यानंतर लत्तलौर या ग्रामनामाचा उल्लेख केलेला आहे.

परळी वैजनाथ, औंढा नागनाथ ही ठिकाणे लातूर जिल्ह्यापासून जवळची आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची शिवसंस्कृती ही लातूर जिल्हाभर पोहचली आहे. गावागावात, परिसरात शिवमंदिरे आढळून येतात. लातूरचे सिद्धेश्वर, भूतेश्वर तसेच औसा येथील मुक्तेश्वर, निलंगा येथील निळकंठेश्वर, शिरुर अनंतपाळचा आनंतेश्वर, मुरुडचा मुरुडेश्वर तर शिरुर ताजबंद येथील महशे या मंदिराचा समावेश होतो. लातूर जिल्हा ऐतिहासिक जिल्हा वंजरा वज्जूला व मांजरा नदीकाठचा संपन्न प्रदेश आहे. लातूर जिल्ह्याची प्राचीनता सातवाहनांच्या पूर्वी ताम्रपाषाणयुगीन अवशेषांनी परिपूर्ण होती. पुण्याच्या डेक्कन कॉलेजने संशोधनाअंती ही वसाहत इ.स. पूर्व ३ ते ५ लाख वर्षापूर्वीची असावी असे मान्य केलेले आहे. त्यामुळे लातूर ऐतिहासिक, सांस्कृतिक व भौगोलिक महात्म्यांनी परिपूर्ण आहे. पुरानांची प्राचीनता अधिक नसली तरी महात्म्य विविध प्रकारानी वर्णिलेले आहे. सदर महात्म्यांनी सांस्कृतिक परंपरा, अनेक आज्ञात गोष्टी समोर येतात. लातूर महात्म्य असलेल्या दोन अपूर्ण प्रती प्राप्त झाल्या आहेत. एक लातूर येथे तर दुसरी किल्लारी ता. औसा येथील राममंदिर संग्रहात आहे. दोन्ही प्रती आपूर्ण अशुद्ध आहेत. दोन्हीवर पण कालोल्लेख नाही. पण भाषा व लिपीवरुन यादवोत्तर आणि शिवपूर्वकालीन असावी कारण भाषा तेवढी प्राचीन नाही. त्यातील ४५ अध्याय व १००० श्लोक त्यातील नदीनामे, ग्रामनामे व देवदेवतांचा उल्लेख आहे. परिसरातील कांही गावे उदा. मांजरा नदी नगरीतील देवदेवतांचे यात संदर्भ आहे.

लातूर एक प्राचीन ऐतिहासिक वैभवशाली नगरी असून अनेक राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली असावीत. तेथील हेमाडपंती मंदिरे अनेक प्रकार व अवशेष यादवकालीन विष्णु अवतारधारी स्वयंभू श्री केशवराज मंदिराचाही उल्लेख रत्नापूर महात्म्यात मिळतो. त्यावरुन लातूर जिल्ह्याच्या ऐतिहासिक वैभवाला दुजोरा मिळतो. शैव, वैष्णव, शाक्त, जैन, बौद्ध, ख्रिश्चन व मुस्लिम इत्यादी धर्मस्थळे आहेत. हिंदू देवस्थानचे व मंदिराचे प्रमाण अधिक आहे. सिद्धेश्वर देवस्थानला दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून लोक येतात. पंचक्रोशित प्रसिद्ध अशी यात्रा भरते.

१.२ संशोधन विषय निवड :

लातूर हे महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील प्राचीन शहर आहे. मध्ययुगीन काळातील राष्ट्रकुट शासकांचा पहिला राजा लातूरचाच मानला जातो. १९४८ पर्यंत लातूर हे हैद्राबाद संस्थानाचा भाग होते. लातूर हे एक प्राचीन पर्यटन, गुफा, लेण्या, असलेले ऐतिहासिक शहर आहे. लातूर जिल्ह्यातील बरीच मंदिरे वास्तू या पाहण्यायोग्य आहेत. या मंदिराकडे हेमाडपंती शैलीचा नमुना म्हणून पाहिली जातात, वास्तुकलेची साक्ष देताना दिसतात. हेमाडपंती शैली ही भारतीय स्थापत्य शैलीपैकी एक प्रमुख शैली आहे.

हेमाद्री पंडित हे १२५९ ते १२७४ या काळात देवगिरीच्या यादव घराण्याचे, राज्याचे मुख्य प्रधान होते. यांनी महाराष्ट्राच्या आणि दखन पठारावर अनेक ठिकाणी या बांधकाम शैलीचा उपयोग केलेला आहे. आजही इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर ही बांधकाम शैली टिकून आहे. हेमाडपंती बांधकाम इतिहास अभ्यासकांना उपलब्ध आहेत. बांधकामासाठी चुना किंवा अन्य कोणत्याच मिश्रणाचा वापर केलेला नसतो तर दगड वेगवेगळ्या कोनातून कापून, घडवून खुंट्या आणि खाचा पाडून ते एकमेकांत घट बसू शकतील अशी रचना केली जाते.वास्तूच्या पायांपासून शिखरापर्यंत सर्व दगड एकमेकांत गुंपून रचना एकसंग उभी राहते आजही या वास्तु ऊन, पाऊस, वारा यांना सहन करीत उभी आहेत. अशी हेमाडपंती स्थापत्य शास्त्राची ओळख आहे.

लातूर जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारसा पाहता येथे अनेक प्राचीन मंदिरे, तीर्थक्षेत्रे आहेत. सोबत इतिहासाला जागणारा संवेदनशील माणूस आहे. लातूर शहरामध्ये राजा ताम्रध्वजाने बांधलेले श्री सिद्धेश्वराचे भव्य मंदिर आहे ते लातूरचे ग्रामदैवत मानले जाते. शहराजवळच केशवराज मंदिर आहे. महाराष्ट्रात लातूर हे ग्रामनाम एकमेव आहे. लातूरचे नामकरण कशा प्रकारे झाले याचा उल्लेख नगपूर शिलालेख, लातूर शिलालेख, कान्हेगाव यादव काळातील शिलालेख, इत्यादीमध्ये आढळतात.

लातूर जिल्ह्याचा संशोधक दृष्टीने विचार केला असता जिल्ह्यामध्ये शैव, वैष्णव, शाक्त, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम इत्यादी धर्मस्थळे,प्रार्थना क्षेत्रे आहेत.त्यात हिंदु देवस्थानाचे प्रमाण अधिक आढळते. लातूरचा ऐतिहासिक वारसा अभ्यासक वाचकांच्या नजरेसमोर प्रमाणित स्वरुपात संशोधनाअंती आणण्याची संधी मिळाली.

१.३ संशोधन विषयाचे महत्व :

मराठवाड्यातील हे महाराष्ट्रातील एक विभाग होय. मराठवाडा विभाग हा आठ जिल्ह्याचा मिळून बनलेला आहे. ज्यामध्ये औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, लातूर हिंगोली जिल्ह्याचा समावेश होतो. ऐतिहासिक दृष्ट्या मराठवाड्याला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. मराठवाडा ही संत, महात्म्य, कलावंत, विचारवंत लाभलेला विभाग मानला जातो. मराठवाडा ही ध्येयवेड्या माणसांची, पराक्रमी पुरुषांची कर्मभूमी आहे. कांही शतकापूर्वी ही खंडतुल्य देशाचा केंद्रबिंदू असणारी वैभव संपन्न भूमी ज्यासाठी आकृष्ट करणारी ठरलेली होती.

मराठवाड्याच्या एकूण जिल्ह्यापैकी लातूर एक जिल्हा होय. लातूर जिल्हा ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, शैक्षणिकदृष्ट्या नावाजलेला जिल्हा आहे. नवा शैक्षणिक, सांस्कृतिक वारसा निर्माण करण्याचे काम लातूर जिल्हा करीत आहे. शिक्षण व ऐतिहासिक प्राचीनता जपण्यात लातूर जिल्हा नेहमी पुढे राहिलेला आहे. लातूर जिल्ह्याची ऐतिहासिकता पाहताना सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव व मध्ययुगीन मुस्लिम शासक अशा राजसत्ता होवून गेल्याचे पुरावे मिळतात. ऐतिहासिक वातावरण निर्माण करताना संत संप्रदायाचा वाटा महत्वाचा वाटतो. राष्ट्रकूटाच्या काळात लातूर जिल्ह्याला महत्व प्राप्त झाले. कारण लातूर हे राष्ट्रकुटाची राजधानी असल्याचा उल्लेख अनेक शिलालेख, ताम्रपट व महात्म्य उपलब्ध आहेत.

यादवकालीन, राष्ट्रकूटकालीन हेमाडपंती मंदिरे विविध नावांनी परिचित आहेत. हेमाद्री हा यादवांचा मंत्री होता. त्या काळात हेमाद्रीने उभारलेली, जिर्णोद्धार केलेली कित्येक मंदिरे त्या काळाची ओळख सांगतात. मांजरा नदीकाठच्या परिसरात स्थिरावलेला जिल्हा संपन्नता व संस्कृतीची साक्ष देतो. एकमेकाशिवाय पूर्णत्व नाही या उक्तीप्रमाणे लातूर जिल्ह्यात धर्म, समाज व संस्कृतीचे एकत्र दर्शन पाहायला मिलते. शिवमंदिर परिसरात याला विविध प्रदेशातील लोक पूर्वीपासून एकत्र आल्याच्या खुना आजही आहेत. त्यामुळे लातूर जिल्ह्याला ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. सर्वसामान्य माणसाला दैनंदिन जीवनापासून उसंत देण्यासाठी देवदेवता व कुलदैवता यांचे दर्शन, पुजा, विधी व जत्रा यांना वेळ देण्याचा योगायोग येथे पाहावयास मिळतो.

स्थापत्य कला जपण्याचे भाग्य लातूर जिल्ह्याला मिळालेले आहे. संशधकाने लातूर जिल्ह्यातील हेमांडपंती मंदिरे एक ऐतिहासिक अभ्यास विषय संशोधनासाठी निवडून सदर मंदिराची ऐतिहासिकता प्राचीनता व त्याविषयीचे संदर्भलेखन करुन लातूर जिल्ह्यातील धार्मिक, ऐतिहासिकतेला उजाळा देण्याचे काम स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व विद्याशाखेकडुन केलेले आहे.

१.४ पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे :एक ऐतिहासिक अभ्यास विषय संदर्भाने पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना बुच व्हॅल्युम व शोधगंगा इत्यादी अन्य शोधपत्रिका व विविध वेबसाईटस यांच्या माध्यमाने सदर विषय शीर्षका संदर्भात आज पर्यतची खालील संशोधने प्राप्त झालेली आहेत.

१. रेणापूर परसर एक ऐतिहासिक अभ्यास ï नंदे सुरेश मनोहर यांनी डॉ कोठारी अनिल यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य केलेले आहे.सदर संशोधनकार्यामध्ये नंदे सुरेश यांनी रेणापूर परीसरातील राजकीय,धार्मिक व ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे.

२. महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक अभ्यास ï बावळे नितीन पांडूरंगराव यांनी सदर विषयावर संशोधन कार्य केलेले आहे.सदर संशोधनकार्यामध्ये बावळे नितीन यांनी महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा विचार करताना जैन तीर्थक्षेत्रांची ऐतिहासिकता पाहिलेली आहे.

३.लातूर जिल्हयातील गढी व वाडयांचा चिकित्सक अभ्यास - सूर्यवंशी नरायण बाबुराव यांनी लातूर जिल्हयातील गढी व वाडयांचा आढावा घेताणा मुलाखती व प्रत्यक्ष गढी व वाडयांची माहिती मिळवलेली आहे. तसेच त्यांची ऐतिहासिकता, रचना सामाजिक,आर्थिक परीस्थितीचा विचार केलेला आहे.

४. मराठवाडयातील धार्मिक स्थळांचा अभ्यास - शेरे राजश्री भालचंद्र यांनी सदर विषय अभ्यासताना मराठवाडयातील ऐतिहासिक धार्मिक स्थळांचा विचार केलेला आहे.सदर शोधकार्यामध्ये आजपर्यंतची धार्मिक स्थळे,मठ,मंदिरे यांचा विचार केलेला आहे.

५. कल्याणीचे चालुक्य कालिन मराठवाडयातील मंदिर मूर्तीशिल्प एक अभ्यास ï साबणे अशोक गंगाराम यांनी सदर विषयांतर्गत ऐतिजहासिम पध्दतीने मराठवाडयातील मंदिर आणि त्यतील मूर्तीशिल्प यांचा अभ्यास केलेला आहे.

संशोधकाने प्रस्तुत विषय संदर्भाने पूर्व संशोधन साहित्याचा व संशोधनाचे पूनरावलोकन केले असता निवडलेला विषय आजपर्यत संशोधनासाठी अध्याप पावेतो आलेला नाही.त्यामुळे सदर विषय वेगळा आहे.संशोधनाची उद्दिष्ट्ये प्रकरण योजना व संशोधकाने प्रस्तुत संशोधनात हेमाडपंती मंदिरांचा विचार केलेला आहे. प्रस्तुत विषयांतर्गत हेमाडपंती मंदिरांची ऐतिहासिकता, सामाजिकता व धार्मिकता व त्यांचे महत्व पाहण्यासाठी सदर विषय संशोधनासाठी घेतलेला आहे.

१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराचा शोध घेणे.

२) लातूर जिल्ह्यातील मंदिरांच्या स्थापत्य शैली अभ्यासणे.

३) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराचे ऐतिहासिक महत्व अभ्यासणे.

४) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराची सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

५) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

१.६ संशोधन गृहितके :

१) राष्ट्रकूट व यादवकालीन राजाश्रयामुळे लातूर जिल्ह्यातील मंदिर स्थापत्याचा विकास झाला.

२) लातूर जिल्ह्यांतर्गत प्राचीन हिंदू मंदिराची संख्या अधिक आढळते.

३) लातूर जिल्हांतर्गत हेमाडपंती मंदिर स्थापत्य उपलब्ध आहेत.

४) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरानी स्थापत्य शैलीमध्ये भर घातलेली आहे.

५) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराचे ऐतिहासिक महत्व आहे.

६) लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराचे सामाजिक व धार्मिक महत्व आहे.

१.७ संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन कार्यात लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे एक ऐतिहासिक अभ्यास असल्यामुळे संशोधकाने सदर विषयी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करुन लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिराचा शोध घेणे व हेमाडपंती मंदिर स्थापत्य शैली आणि जिल्हांतर्गत मंदिराचे ऐतिहासिक महत्व अभ्यासणाचे योजिले आहे.

१.८ संशोधन संदर्भ साधने :

संदर्भाशिवय ऐतिहासिक संशोधन अशक्यप्राय असते. ऐतिहासिक वास्तू स्थापत्याचे सत्य कथन मांडण्यासाठी संशोधकाने लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे एक ऐतिहासिक अभ्यास विषय अभ्यासताना पुरातत्वीय प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांची व प्रत्यक्ष मंदिरे लातूर जिल्ह्यातील १० शिलालेख, ४ ताम्रपट, ५ महात्म्य व लिखित अलिखित साधनाचा आढावा घेतलेला आहे.

१.९ संशोधन व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्य हे लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे एक ऐतिहासिक अभ्यास असल्याने संशोधन लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरापुरतेच व्यापक आहे.

प्रस्तुत शोधकार्य लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे यांच्या संबंधित असल्याने हेमाडपंती मंदिरासंबंधी साहित्य, शिलालेख, ताम्रपट व प्रत्यक्ष लातूर जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे यांच्या पुरतेच मर्यादीत आहे.

१.१० प्रकरण योजना :

प्रकरण पहिला : विषय प्रवेश

- १.१ प्रस्तावना
- १.२ संशोधन विषय निवड
- १.३ संशोधन विषयाचे महत्व
- १.४ पूर्व संशोधन साहित्याचा आढावा
- १.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये
- १.६ संशोधनाची गृहीतके
- १.७ संशोधन पद्धती
- १.८ संशोधन संदर्भ साधने
- १.९ संशोधन व्याप्ती व मर्यादा
- १.१० लातूर जिल्ह्याची भौगोलिक स्थिती
- १.१०.१ लातूर जिल्हा क्षेत्रफळ व चतुःसीमा
- १.१०.२ लातूर जिल्ह्यातील एकूण तालुके

१.१०.३ लातूर जिल्ह्यातील नद्या

१.१०.४ लातूर जिल्ह्यातील पर्जन्यमान

प्रकरण दुसरे : लातूर जिल्हा ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.१ प्रस्तावना

२.२ ऐतिहासिक विविध सत्ता

२.३ राष्ट्रकुट घराणे

२.४ देवगिरीचे यादव घराणे

२.५ अल्लाउद्दीन खिलजी व तुघलक घराणे

२.६ बहामनी साम्राज्य विविध शाह्या-बरीदशाही, निजामशाही, आदिलशाही

२.७ मोघल सत्ता

२.८ मराठेशाही

२.९ हैद्राबाद निजामशाही

प्रकरण तिसरे : हेमाडपंती मंदिराचा इतिहास

३.१ प्रस्तावना

३.२ हेमाद्रीचे चरित्र व कृतुत्व

३.३ हेमाद्रीची मंदिर निर्मिती

३.४ हेमाडपंती मंदिरे बांधकाम प्रारंभ

३.५ हेमाडपंती मंदिराची वैशिष्ट्ये

३.६ हेमाडपंती मंदिर शैली

प्रकरण चौथे : लातूर व औसा परीसरातील हेमाडपंती मंदिरे

४.१ श्री सिध्देश्वर मंदिर लातूर

४.२ रत्नेश्वर मंदिर लातूर

४.३ केशवराज मंदिर लातूर

४.४ मुरूडेश्वर मंदिर मुरूड

४.५ रेणूकादेवी मंदिर रेणापूर

प्रकरण पाचवे : निलंगा व शिरूर अनंतपाळ परीसरातील हेमाडपंती मंदिरे

५.१ श्री निळकंठेश्वर मंदिर निलंगा

५.२ श्री महादेव मंदिर हिप्पळगाव

५.३ सोमेश्वर मंदिर तळीखेड

५.४ आनंतपाळ मंदिर शिरूर आनंतपाळ

५.५ महादेव मंदिर डोंगरगाव

५.६ नाथ मंदिर निटूर

प्रकरण सहावे : अहमदपूर व चाकूर परीसरातील हेमाडपंती मंदिरे

६.१ महेश मंदिर शिरूर ताजबंद

६.२ महादेव मंदिर तिर्थ धानोरा

६.३ शिध्देश्वर /महादेव मंदिर झरी नवकुंड

६.४ नागनाथ मंदिर वडवळ नागनाथ

६.५ महादेव मंदिर जानवळ

प्रकरण सातवे : उदगीर,जळकोट व देवणी परीसरातील हेमाडपंती मंदिरे

७.१ श्री दत्त मंदिर देवर्जन

७.२ उदयगिरी बाबा मंदिर

७.३ सोमनाथपूर शनी मंदिर उदगीर

प्रकरण आठवे : उपसंहार व संशोधन निष्कर्ष

सदर संशोधन आराखडयातील प्रकरण योजना इ. मध्ये संशोधन परीपूर्ती पर्यत काही प्रमाणात बदल संभवतो.

१.११ संदर्भ सूची

१) मोरवंचीकर रा. श्री, (२००९), आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण शिल्पकार चरित्रकोष खंड-१ साप्ताहिक विवेक हिंदुस्तान प्रकाशन संस्था,

२) कठारे, साखरे, पाटील, (२०११), पुरातत्व विद्या वस्तू संग्रहालय शास्त्र आणि पर्यटन, औरंगाबाद : विद्यु बुक्स पब्लिशर्स.

३) पाठक अरुणचंद्र (२००९), मराठवाडा एक शोध, डोंबिवली : सुमेरु प्रकाशन,

४) काळे भाग्यश्री, (२००९), महाराष्ट्राची मंदिर शैली, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

५) सौताडेकर वि. स. (२००४), लातूर काल आणि आज.

६) केशवराज गौरविका माघ शु. ११ ते माघ शु. १३ शके १९१५.

7) आग्रे सुप्रिया, (१९८६), तीर्थक्षेत्रे दर्शन,पुणे अतुल बुक एजन्सी.

८) जोशी महादेवशास्त्री, (संपा.),भारतीय संस्कृतीकोष,खंड-४ महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ मुंबई १९६७

९) जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपा.),मराठी विश्वकोष,खंड-६ महाराष्ट्र राज्य, संस्कृती मंडळ मुंबई १९७९

10) गॅझेटीअर लातूर महाराष्ट्र राज्य १९८८

11) देव शा.बा. (१९६८), महाराष्ट्र एक पूरातत्वीय समालोचन, मुबई

12) पाठक अ.शं. (संपा.),राज्य गॅझेटीअर, स्थापत्य व कला.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.दामाजीवाले माधव दिगंबर
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर (ता)

संशोधक
कदम व्यंकट काशिनाथराव